| महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे<br>विभागीय मंडळ, पुणे.४११००५<br>MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005 |
|---|

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
|---|---|---|
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |


महत्वाचे

क्रमांक : पुविमं/डीपी/संलग्नता/ 5618
पुणे-४११००५
दिनांक :- १७/१०/२०२४
२१

प्रति,

मुख्याध्यापक ,
लेट.श्री.एकनाथ नामदेव गटकळ
इंग्लिश मिडीयम स्कूल, टाकळीभान
ता. श्रीरामपूर जि.अहमदनगर.

विषय माध्यमिक शाळेस विभागीय मंडळ संलग्नता व तात्पुरता सांकेतांक क्रमांक देणेबाबत..

संदर्भ :- १. आपला प्रस्ताव दिनांक- १५/१०/२०२४ चे पत्र
२. विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे जा.क्र.शिउसं/माध्य-३०३/ नविन सांकेतांक क्र. /पुवि/२०२४/११७१८ दिनांक १५/१०/२०२४ चे पत्र.
३. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-३/७४८९ दिनांक- ४ सप्टेंबर, २००६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने व संदर्भानुसार आपल्या माध्यमिक शाळेस मार्च-२०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी खालीलप्रमाणे तात्पुरती पुणे विभागीय मंडळ संलग्नता व सांकेतांक क्रमांक देण्यात येत आहे.

| इ.१० वी | | अध्यापनाचे विषय | |
|---|---|---|---|
| माध्यम :- इंग्रजी | मंडळ मान्यता सांकेतांक क्रमांक S-12.14.064 | १. इंग्रजी (प्रथम भाषा ०३) | ६. सामाजिकशास्त्र (७३) |
| | | २. मराठी (व्दितीय/तृतिय भाषा १६) | ७. जलसुरक्षा |
| | | ३. हिंदी (व्दितीय/तृतिय भाषा १५) | ८. संरक्षणशास्त्र |
| | | ४. गणित (७१) | ९. आरोग्य व शारीरिक शिक्षण |
| | | ५. विज्ञान व तंत्रज्ञान (७२) | |

आपल्या माध्यमिक शाळेस मार्च व जुलै परीक्षेसाठी खाली नमूद केल्यानुसार परीक्षा केंद्र निर्धारीत करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| मार्च परीक्षेसाठी | परीक्षा केंद्र क्रमांक :- २०४६ |
| | परीक्षा केंद्राचे नाव :- न्यु इंग्लिश स्कूल टाकळीभान, ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर |
| जुलै परीक्षेसाठी | परीक्षा केंद्र क्रमांक :- २०४१ |
| | परीक्षा केंद्राचे नाव :- डी.डी.काचोळे माध्यमिक विद्यालय. श्रीरामपूर जि. अहमदनगर |

(कृ.मा.प.)

Malappa2

सदर निर्धारीत करण्यात आलेले परीक्षा केंद्र मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी सादर करण्यात येणाऱ्या ऑनलाईन आवेदनपत्रावर विहित ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे.

## पुढील सलग ०५ वर्षे नुतनीकरण करण्यात यावे.

विभागीय मंडळाकडून दिलेला तात्पुरता सांकेतांक क्रमांक कायम करण्यासाठी राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./ परीक्षा-३/७४८९ दि. ४ सप्टेंबर, २००६ नुसार आपल्या माध्यमिक शाळेला दिलेला तात्पुरता सांकेतांक क्रमांक वर्ष २०२५-२०२६ पासून शैक्षणिक वर्ष २०२९-२०३० पर्यंत प्रत्येक वर्षी त्या शैक्षणिक वर्षात १५ मे पर्यंत विहित नमुन्यात शुल्कासह प्रस्ताव सादर करून मंडळ मान्यता नूतनीकरण करून घेणे आवश्यक आहे.

मंडळ मान्यता नूतनीकरण प्रस्तावात विहीत नमुन्यातील फॉर्म, मंडळ मान्यता पत्राची छायांकीत प्रत व त्या त्या वर्षाकरीता शाळा तपासणी अहवाल (शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांचे शिफारशीसह) दि. १५ मे पर्यंत रू. १,०००/- शुल्कासह तद्नंतर दि. ३१ ऑगस्ट पर्यंत रू.१,६००/- (नूतनीकरण शुल्क व दंड) व त्यापुढे प्रत्येक महिन्यात रू. १००/- दंडात्मक शुल्क प्रस्ताव प्रत्यक्ष सादर करेपर्यंत भरावा लागेल.

वरील पद्धतीने व निर्धारीत कालावधीत नूतनीकरण घेतल्याशिवाय आगामी मार्च परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्रे सादर करणे नियमबाह्य असेल, याची नोंद घ्यावी. सलग पाच वर्षे मंडळ मान्यता नूतनीकरण करून झाल्यानंतर सन २०२३-२०२४ साठी देण्यात आलेला तात्पुरता सांकेतांक क्रमांक कायम करण्याकरीता शिक्षण उपसंचालक, पुणे यांची शिफारशीसह प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

**विभागीय मंडळाने दिलेली तात्पुरती मंडळ मान्यता खालील अटी / शर्तींचा भंग केल्यास आपोआप रद्द होईल.**

१. पुढील शैक्षणिक वर्षाकरीता मंडळ मान्यता नूतनीकरण न करता परीक्षा आवेदनपत्र भरल्यास.
२. परीक्षा कामकाजासाठी केंद्रसंचालक / दालन पर्यवेक्षक / परीक्षक / नियामक / मुख्य नियामक / प्राश्निक इ. मनुष्यबळ पुरविण्यासाठी नकार दिल्यास.
३. परीक्षा संचालनाकरीता माध्यमिक विद्यालयात उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा न पुरविल्यास.
४. विभागीय मंडळ सूचना किंवा आदेशाचे पालन न केल्यास.
५. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर इ. १० वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क (रजिस्ट्रेशन फी) व शिक्षण संक्रमण फी १० ऑगस्ट पर्यंत मंडळास सादर न केल्यास.
६. परीक्षा संचालनामध्ये आपल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांनी गैरमार्ग केल्यास.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - ५

प्रत माहीती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :-
१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
२. शिक्षणाधिकारी माध्य. , जिल्हा परीषद,अहमदनगर.
३. पुणे विभागीय मंडळातील सर्व शाखा प्रमुख.